वि. दि. दावा क्र. ५१३-२०२३
निशाण क्र. ६६ ची पुरवणी

<u>प्रतिवादी १ ते ३ तर्फे साक्षीदार क्र.०१ यांची सरतपासणी प्रतिवादी १ ते ३ तर्फे वकील श्री. बी.टी.देवी यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>

मी विकसनासाठी आणलेल्या साहित्याच्या पावत्या माझेकडे आहेत. मी कमलाई अर्थमुव्हर्स यांचेकडून ट्रॅक्टर भाडेकामी घेतल्याबाबतच्या पावत्या आहेत. त्यांना मी त्याकामी एकुण १७,०००/– रुपये दिलेले आहेत. सदरची रक्कम मीच दिलेली आहे. सदर दस्तावर बिडवे यांची स्वाक्षरी आहे. सदर दोन्ही दस्तास **आर्टिकल अ व ब** देण्यात येते. तसेच मी लक्ष्मी सिमेंट कणसागरा यांचेकडुन सिमेंट पोल आणल्याबाबत दोन पावत्या आहेत. सदर पावत्या मध्ये नमुद असलेली रक्कम मी दिलेली आहे. सदर पावत्यावरती दुकान मालकाची स्वाक्षरी आहे. सदर दस्तास **आर्टिकल क व ड** देण्यात येते. मी चव्हाण टेडर्स यांचेकडुन सिमेंट आणलेले होते. सदर सिमेंटकामी पैसे मी दिलेले आहेत. सदर सिमेंट खरेदी दस्त मी अभिलेखावर दाखल केलेला आहे. सदर सिमेंट साठी मी ६४,४००/– रुपये दिलेले आहेत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, ६,४४४/– रुपये दिलेले आहेत. सदर दस्तास **आर्टिकल इ** देण्यात येत आहे.

त्यानंतर मी सावंत हार्डवेअर ॲण्ड पेंट यांचेकडुन रंग आणलेबाबतच्या दोन पावत्या आहेत. त्यातील रक्कम मी दिलेली आहे. सदर पावत्या पैकी पावती क्र. ७९६ यास **आर्टिकल ई** देण्यात येत आहे. तसेच पावती क्र. ३८८ यास **निशाण क्र.७४** देण्यात येतो. मी तिरुपती ट्रेडर्स यांचेकडुन चार वेळा स्टील आणि सिमेंट खरेदी केलेले आहेत. सदर तिरुपती ट्रेडर्स यांचेकडील पावती क्र. २०३७, २०४१, २०४४, २०४८ यांना अनुक्रमे **आर्टिकल उ, ऊ, ए, ऐ** देण्यात येत आहे. त्यातील भरणा मी केलेला असून त्यावर मालकाची स्वाक्षरी आहे. मी गणेश स्टोन पॉलीशिंग ॲण्ड कटींग यांचेकडुन स्टील खरेदी केलेले आहेत. त्याबाबत मी दोन पावत्या अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. त्यातील रकमेचा भरणा मी केलेला असून त्यावरती त्या दुकान मालकाची स्वाक्षरी आहे. सदर दोन पावत्यांना अनुक्रमे **आर्टिकल ओ, औ** देण्यात येते. सदर देयके देण्यासाठी मी माझे शेतीतील शेती माल विकुन भरणा केलेला आहे.

मी सदर विकसनाच्या बांधकाम करण्यापूर्वी त्या मिळकतीचे फोटो काढलेले होते. सदर फोटो काढण्याकामी मीच आदेशित केले होते. सदर फोटो काढायचे

सांगणेकामी माझे सोबत संतोष देवकर हा होता. संतोष देवकर याने माझे समोर फोटो काढण्याच्या पावतीवर स्वाक्षरी केलेली होती. त्या पावतीतील रकमेचा भरणा मी केलेला आहे. त्या पावतीवर पद्यमा फोटो स्टुडीओ यांचे दुकानचा स्वाक्षरी व शिक्का आहे. सदर दस्तास **आर्टीकल अं** देण्यात येतो. मी अभिलेखावर गट नं. १९९ चे ६ फोटो दाखल केलेले आहेत. सदर फोटोंना अनुक्रमे **आर्टीकल अ–१ ते अ–६** देण्यात येते. मला मुख्याधिकारी, नगरपरिषद करमाळा यांचे मार्फत मला विकसन काम न करणेबाबत नोटीस आलेली होती त्याबाबतची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर दस्तास **आर्टिकल अ:** देण्यात येत आहे.

**<u>प्रतिवादी १ ते ३ यांचे तर्फे साक्षीदार क्र.०१ यांची उलटतपासणी वादी तर्फे वकील श्री. आर.व्ही.दिवाण यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

माझे शिक्षण इयत्ता दहावी पर्यंत झालेले आहे. मला लिहिता वाचता येते. शिवाजी चिंचकर हा माझा मुलगा आहे. शिवाजीचे शिक्षण दहावी अनुत्तीर्ण असे झालेले आहे. मी मराठी मध्ये स्वाक्षरी करतो. हे मला माहिती नाही की, माझा मुलगा इंग्रजी अक्षरात स्वाक्षरी करतो किंवा कसे. आता मला अभिलेखावर निशाणी क्र. ४५, ४६, ४७ वरील दस्त दाखविला त्या तिन्ही दस्तावरती लिहून देणार म्हणुन माझी स्वाक्षरी आहे. मंगल माझे पत्नीचे नाव असून त्या अशिक्षीत आहेत. त्या स्वाक्षरी कामी अंगठा लावतात. अभिलेखावरील निशाण क्र. ४५, ४६ वरती माझी पत्नी मंगल यांनी स्वाक्षरी कामी अंगठा लावलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाण क्र. ४५, ४६ वरती संमती देणार म्हणुन माझी पत्नी मंगल हिने अंगठा लावलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, अभिलेखावरील निशाण क्र. ४५ व ४६ वरती माझा मुलगा शिवाजी याने सुध्दा संमती म्हणुन स्वाक्षरी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कुटुंबातील कोणताही निर्णय आम्ही तिघे मिळून म्हणजेच मी, माझी पत्नी व मुलगा असे मिळून घेत असतो.

हे म्हणणे खरे आहे की, जमिन गट नं. १९९ मधील मिळकत प्लॉटींग कामी निवासाच्या विकसनाकामी करायची असे ठरविले होते. हे म्हणणे खरे आहे की, मला सन २०१५–१६ मध्ये विकसनाचे कोणतेही ज्ञान नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, वादीने करमाळा शहराच्या सभोवताली ब–याच मिळकती विकसनातून विकसीत केलेल्या

आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझी गट नं. १९९ मधील मिळकत विकसन करण्याकामी मी वादी सोबत करार केला. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणत्याही दस्तावर दस्त वाचून, समजावून घेवून स्वाक्षरी करत असतो. माझे मुलाला लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १९९ ही मिळकत पूर्वी माझे आईचे नावे होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे आईचे नावावरुन ती पुढे माझे नावावर आली.

माझे थोरल्या भावाचे नाव दत्तात्रय हे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे भाव दत्तात्रय याने सन २००८ मध्ये माझे विरुध्द दिवाणी न्यायालय, करमाळा येथे वादमिळकती बाबत दावा दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यात दत्तात्रय याचे असे कथन होते की, गट नं. १९९ मधील मिळकत आईचे नावे खरेदी करते वेळी त्या रकमेचा भरणा त्याने केलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, सन २००८ च्या दाव्यात माझा दुसरा भाऊ महादेव, विष्णू व एक बहिण आणि महादेव यांचे नंतर त्यांचे वारस त्या दाव्यात दाखल झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दाव्यात माझे इतर भाऊ, बहिण व त्याचे वारस हजर होवून त्यांचे म्हणणे होते की, ती मिळकत एकत्र कुटुंबाची आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील विठोबा हे सैन्य दलात नोकरीस होते व तेथूनच ते सेवा निवृत्त झाले. हे म्हणणे खरे आहे की, विठोबा यांना शासनाकडून मौजे खडकी येथे जमिन मिळालेली होती.

हे म्हणणे खरे आहे की, मी माझी बहिण बायडाबाई व इतर भावांविरुध्द खडकी येथील मिळकतीबाबत सन २०११ मध्ये दावा दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यात माझे असे कथन होते की, खडकी येथील मिळकत फक्त मला एकट्यालाच मृत्युपत्राद्वारे दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सन २००८ मध्ये दाव्यात माझी साक्ष झालेली आहे, मी प्रत्येक तारखेवर माझे विधिज्ञांमार्फत हजर राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सन २०११ मध्ये मी एकटाच माझे इतर भावडांविरुध्द त्या दिवाणी दाव्यात लढा देत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सन २०११ च्या दाव्यात माझे वतीने साक्षीदार म्हणुन माझे एकट्याचीच साक्ष झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे इतर भावडांनी गट नं. १९९ बाबत करमाळा येथील न्यायालयात दावा दाखल केलेला असून तो अद्याप पावेतो प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकतीच्या

लगत बाबाराव क्षिरसागर, रामचंद्र क्षिरसागर यांची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १९९ च्या मिळकती बाबतीत रामचंद्र क्षिरसागर यांनी माझे विरुध्द दावा दाखल केलेला होता. हे मला आठवत नाही की, रामचंद्र क्षिरसागर याने सन २००७ साली दावा दाखल केला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यात माझी साक्ष झालेली होती.

हे म्हणणे खरे आहे की, क्षिरसागर व आमचा रस्त्याकामीचा वाद सन १९८५ सालापासुन चालु होता. सन १९८५ चा दावा मी क्षिरसागर यांचे विरुध्द रस्ता अडविल्यामुळे दावा केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये सुध्दा माझी साक्ष झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे कडे न्यायालयीन कामकाजाचा व प्रक्रियेचा दांडगा अनुभव आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयीन प्रक्रिया मला माहित असल्यामुळे त्याबाबतीतील दस्त कसे गोळा कराचे हे माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी अभिलेखावर आर्टीकल अ पासुन ते अ: पर्यंतचे सर्व दस्त माझे न्यायालयीन कामकाजाच्या अनुभवावरुन दाखल केलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निशाण क्र. ४५ व ४६ वरील दस्त हे कर्जत येथील नोटरी कडे नोटराईज केलेले आहे.
**प्रश्न –** तुम्ही सुनिल लुणिया याचे सोबत कर्जत येथे कशासाठी गेला होता.?
**उत्तर –** सुनिल लुणिया याने मला गाडीत बसवून कर्जत ला नेले व म्हणाला तुमचे विना पैशात एन.ए. करुन डेव्हलप करुन देतो, त्यांना त्यावेळी रस्त्याची गरज होती, त्यामुळे आम्ही विना पैशात विकसन होत असलेमुळे त्या दस्तावर स्वाक्ष–या केल्या, त्यावेळी सुनिल लुणिया मला म्हणाले आपला तयार केलेला स्टॅम्प क्षिरसागर यांना दाखवितो.

आता साक्षीदारास निशाण क्र.७६ वरील एकूण १४ दस्त दाखविले त्यापैकी दि. ०६/०६/२०१९, ०२/०७/२०१९, १९/०८/२०१९, वरील नावे पावती शिर्षकाखाली पैसे घेणा–याची सही साक्षीदाराचीच असल्याचे त्यांनी सांगितले. सबब वरील तिन्ही नावे पावतीस अनुक्रमे **निशाण क्र. ७७, ७८ व ७९** देण्यात येत आहे. त्याच वेळी कॅश व्हावचर दि.२९/०८/२०१९, ०६/०९/२०१९, ०३/१०/२०१९, ०७/११/२०१९, १८/१२/२०१९ या पाचही व्हावचर वरील पैसे

घेणा–याची स्वाक्षरी ही त्याचींच असल्याची सांगतात. सबब त्या पाचही कॅश व्हावचरला **निशाण क्र. ८० ते ८४** मुळ प्रतीत असलेमुळे देण्यात येत आहे. तसेच नावे पावती शिर्षकाखाली दि. २७/१२/२०१९ आणि दि. १०/०१/२०२० रोजीच्या दोन्हीही मुळ पावत्या असून त्यातील पैसे घेणा–याची स्वाक्षरी ही त्याचींच असल्याचे सांगत असलेमुळे त्यांना अनुक्रमे **निशाण क्र. ८५ व ८६** देण्यात येतो. त्याच वेळी दि. २७/०४/२०२० रोजीची नावे पावती व पैसे घेणा–याची स्वाक्षरी ही साक्षीदार त्याचीच असल्याची सांगतात. सबब मुळ पावती असल्याने त्या दस्तास **निशाण क्र. ८७** देण्यात येतो. त्याच वेळी पुढील तीन नावे पावती वर माझी स्वाक्षरी नसुन ती माझे मुलाची आहे किंवा कसे हे मला सांगता येत नाही.

हे म्हणणे खरे आहे की, सन २०१९ मध्ये मी आजारी पडलो होतो. त्यावेळी मला मृत्रपिंडाच्या आजाराने मी ग्रस्त होतो. त्यावेळी मला चालता फिरता येत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी आजाराने ग्रस्त झालेपासुन मुलगाच सर्व कामे पाहतो. हे मला माहिती नाही की, मी आजारी असल्यामुळे माझे मुलाने वादी यांचेकडुन रक्कम घेतलेली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, निवासी विकसनासाठी प्रकरण चालु करायचे असते तेंव्हा सर्व प्रथम संचिका सोलापूर येथे पाठवावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, सोलापूर येथील नगर रचना कार्यालयाच्या आदेशाप्रमाणे त्या संचिकेकामी लागणारी सर्व दस्ते जोडून द्यावी लागतात. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १९९ च्या ७/१२ उतारे मध्ये वाडग्याच्या संदर्भाने इंदुरे, रासकर व सुरवसे इ. यांची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी विशिष्ठ गटा बाबतीतील प्रकरण नगर रचना खात्याकडे देतो त्यावेळी ७/१२ उतारेवरील सर्व खाते धारकाच्या सहया लागतात. हे म्हणणे खरे आहे की, जो व्यक्ती प्रकरण नगर रचना खात्याकडे देतो त्याच व्यक्तीच्या नावावरती कागदपत्राची पुर्तता व इतर बाबीची पुर्तता होत असते.

आता मला निशाण क्र. ७६ वरील दस्त क्र. १५ दाखविला. सदरचा दस्त माझे नावे सहाय्यक संचालक, नगर रचना सोलापूर यांचेकडून निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर दस्त हा सार्वजनिक असल्यामुळे व साक्षीदाराने त्याचेच नावे आलेली असल्याचे मान्य केल्याने त्यास **निशाण क्र.८८** देण्यात येत आहे. आता मला त्याच

यादीतील दस्त क्र. १६ दाखविला जो दस्त मुख्याधिकारी करमाळा यांनी बळीराम चिंचकर यांना प्रती म्हणुन निर्गमित केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दस्तात विशिष्ठ दस्ताची पुर्तता न केलेबाबत कळविलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नगर रचना कार्यालयाकडुन विकसनाकामीचे मुळ दस्त माझेकडे येणे अपेक्षित आहे परंतू ते सुनिल लुणिया यांचेकडे कसे गेले ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सुनिल लुणिया हे माझे विकसनाचे काम करत असलेमुळे ज्याज्यावेळी मला नगर रचना कार्यालयाकडुन दस्त प्राप्त होत होते ते दस्त आम्ही सुनिल लुणिया यांचेकडे देत होतो.

हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १९९ च्या पश्चिमेस क्षिरसागर यांची गट नं. १९८ मधील मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १९८ च्या पश्चिमेस नगरपरिषेदेचा रस्ता आहे. साक्षीदार सांगतो की, अगोदर ओढा आहे व त्यानंतर रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला पश्चिमेकडून माझे मिळकती मध्ये जायचे असल्यास सर्व प्रथम ओढा, क्षिरसागर यांची जमिन व नंतर माझे जमिनीमध्ये जाता येते. हे म्हणणे खरे आहे की, माझे जमिनीचे पुर्व दिशेस शेतजमिनच होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे मिळकतीच्या दक्षिण दिशेस रासकर यांची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे व क्षिरसागर यांचे मिळकतीच्या उत्तरेस भुसारे यांची शेतजमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१९९ मध्ये जाणेसाठी दक्षिण, पूर्व व उत्तरेकडून रस्ता नाही. हे म्हणणे खरे आहे की, तिन्ही बाजुला रस्ता नसलेमुळे मला क्षिरसागर यांचे मिळकती मधुन रस्ता हवा होता. हे म्हणणे खरे आहे की, मी व क्षिरसागर असे मिळुन दोघांनी त्या रस्त्याबाबत प्रतिज्ञापत्र तयार केलेले होते. आता मला दि.२८/०४/२०१७ रोजी प्रतिज्ञापत्र दाखविले. सदर दस्त साक्षीदाराने मान्य केल्याने त्यास **निशाण क्र.८९** देण्यात येतो. साक्षीदार सांगतो की, सदर प्रतिज्ञापत्र होण्यापूर्वी वादीने आम्हाला पैसे देण्याचे ठरले होते. मी तथाकथित पैसे देण्याबाबतीत वादी यांना त्याबाबतीत नोटीस पाठविलेली नाही. मी तथाकथित वादीच्या कथना प्रमाणे विशिष्ठ गुंठे गेल्यामुळे व विशिष्ठ रक्कम दिल्यामुळे वादी विरुध्द कोणताही दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथत पैसे देण्याची बाब लेखी स्वरुपात झालेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सुनिल

लुणिया मला तथाकथीत रस्त्यासाठी पैसे देतो म्हणाला होता हे मी खोटे न्यायालयात सांगत आहे.

हे म्हणणे खरे आहे की, विकसना कामी मी अथवा माझे भाउ यांनी कोणत्याही दस्ताची पुर्तता नगर रचना खात्याकडे केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ७/१२ उतारेतील सहधारकांच्या स्वाक्ष–या आणण्याकामी टाळाटाळ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी विकसनाकामी कार्यवाही केली त्यावेळी करमाळा न्यायालयात २००८ सालचा दावा जो माझे भावाने दाखल केलेला होता तो प्रलंबित होता.

प्रश्न – तुमच्या करारात असे ठरले होते की, करमाळा न्यायालयातील सन २००८ सालच्या दाव्यातील बाबी तुम्ही वादींना कळवाव्यात परंतू कळविलेल्या नाहीत.

उत्तर – वादी म्हटला होता कोर्टातील कामे मी बघतो.

हे म्हणणे खरे नाही की, वादीने मुरुम टाकला, रस्त्याच्या कडेला झाडे लावली, जमिन सपाटीकरण केले, नगररचना कार्यालयाकडे ले आऊट व नकाशेसहीत प्रकरण सादर केले, रस्ता तयार करण्याकामी योग्य ती कार्यवाही केली, गट नं. १९९ व १९८ या दोन्ही ही मिळकती कामी वापरण्यायोग्य असा ओढयावरुन पुल तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, वादीने गट नं. १९९ कामी पुल तयार करुन दिला व त्यानंतर मी विकसनाकामी कोणतीच कागदोपत्री मदत वादींना केली नाही व वादी सोबत केलेल्या कराराचा स्वत:हून भंग केला.

हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० मध्ये जागतिक महामारी कोरोनाची साथ मोठया प्रमाणात पसरलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी आजारी असलेमुळे व कोरोनाच्या थैयमानामुळे मी खडकी येथे राहणेकामी गेलेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, कोरोनामुळे माझा व वादी लुणिया मधील प्रत्यक्ष संपर्क कमी झालेला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी ऑक्टोबर २०२० मध्ये अचानक बीड येथील विकसकास वादग्रस्त मिळकत विकसनाकामी दिली. हे म्हणणे खरे नाही की, विकसना नंतर २२टक्के वादग्रस्त मिळकती मधील प्लॉट हे वादींना देण्याचे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, करार नाम्या प्रमाणे २२ टक्के क्षेत्र वादग्रस्त मिळकती पैकी मला वादी यांना खरेदी देणे

भाग पडते. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)

दि. ०४–०३–२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा